पेशवा

# पहिला बाजीराव

(उत्तरार्ध)

— प्रा.श.श्री. पुराणिक



# पेशवा पहिला बाजीराव

## उत्तरार्ध

( १७३१ - १७४० )

लेखक
प्रा. श. श्री. पुराणिक

काळ प्रकाशन, पुणे

प्रकाशक
मुकुंद शंकर दाते
काळ प्रकाशन,
१४०४, सदाशिव पेठ, पुणे - ३०.

© प्रा. श. श्री. पुराणिक

प्रथमावृत्ति
१८ ऑगस्ट २०००

मुद्रक
मुकुंद शंकर दाते
यशवंत मुद्रणालय,
१८२६/२, सदाशिव पेठ, पुणे - ३०.

अक्षरजुळणी
पॅम आर्टस् ॲण्ड प्रिंट
सौ. पद्मिनी रुईकर
१३९५, कसबा पेठ, पुणे ४११०११.
दूरध्वनी : ४४५६६१७

मूल्य रु. ३००/-

श्री. गोपाळराव व सौ. शुभांगी
तसेच
चि. मनीषा-चि. कांचन-चि. आनंद
या
जोगळेकर कुटुंबियांस
सप्रेम समर्पण

# भरत वाक्य

'पेशवा पहिला बाजीराव' या ग्रंथाचा पूर्वार्ध १८ ऑगस्ट १९९९ रोजी बाजीरावाच्या जन्मत्रिशताब्दीच्या दिवशी प्रसिद्ध झाला. आज हा उत्तरार्ध प्रसिद्ध होऊन बाजीरावाचे चरित्र पूर्ण झाले हे वाचकांस कळविताना संतोष वाटतो. १९८८ च्या ऑगस्टात हे चरित्र मी लिहिण्यास सुरुवात केली. १९९० च्या फेब्रुवारीत ते पूर्ण झाले. त्यानंतर दहा वर्षे प्रयत्न करूनही चरित्र प्रकाशित होऊ शकले नाही. मध्यंतरी बिचाऱ्या 'बाजीरावा'वर अनेक आपत्ति कोसळल्या. चरित्राचा गाभा असलेली, १७३०-४० हा कालखंड वर्णन करणारी, हस्तलिखित प्रतच हरवली. ती पुन्हा लिहून काढावी लागली आणि 'प्रकाशा'ची प्रतीक्षा करीत बसावे लागले. अतिवृष्टीने किंवा अनावृष्टीने पिके हातची गेल्यानंतरही शेतकऱ्याने पुन्हा पेरणी करावी व मेघराजासाठी आकाशाकडे डोळे लावून बसावे तसे झाले.

अखेर पाऊस कोसळला, अगदी हस्ताचा मुसळधार पाऊस कोसळला आणि श्रमांचे सार्थक झाले. असा पाऊस बाजीरावाच्या बाबतीत गेल्या तीनशे वर्षांत कोसळला नव्हता. या वर्षी त्याच्या जन्माला तीनशे वर्षे पूर्ण झाली. ती त्रिशताब्दी साजरी करण्यासाठी बाजीरावाचेच वंशज असल्याचे भाग्य लाभलेले श्री. वि. वि. पेशवा आणि श्री. कृष्णराव पेशवा यांनी बाजीराव जन्म त्रिशताब्दी समिति स्थापन केली. तिच्या विद्यमाने श्री. निनाद बेडेकर, प्रा. प्र. के. घाणेकर, प्रा. प्रफुल्लकुमार तावडे, डॉ. ताकवले, श्रीमती गायत्रीदेवी पटवर्धन इत्यादि बाजीरावाच्या अभ्यासकांची व्याख्याने झाली. बाजीरावाच्या समाधि व जन्मस्थळाच्या पारदर्शिका दाखवण्यात आल्या. अनेक सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले. बाजीरावाबद्दल अभूतपूर्व जागृति निर्माण झाली व त्या मुहूर्तावर बाजीरावाचे हे चरित्र दोन भागात प्रसिद्ध होत आहे. त्यामुळे चरित्राला एकदम उठाव मिळाला. कोणतीही गोष्ट मुहूर्तावर झाली म्हणजे बरे असते. लग्न करणे केव्हाही चांगलेच, पण ते सुमुहूर्तावर झाले म्हणजे शुभ आणि मंगल होते. वास्तुशांति करणे चांगलेच, पण ती मुहूर्तावर करणे लाभदायक असते. रामाचे चरित्र केव्हाही गावे पण रामनवमीला गाणे विशेष पुण्यकारक आहे. पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनाला सर्वच काळ शुभ आहेत पण आषाढी-कार्तिकीचे महत्त्व भक्तजनांच्या दृष्टीने विशेष आहे. गीता सांगणाऱ्या पार्थसारथी भगवंताचे चिंतन नेहमीच पुण्यप्रद पण गोकुळाष्टमीच्या दिवशी विशेष फलदायक आहे. महाराष्ट्राला 'महा-राष्ट्र' करणाऱ्या शिवछत्रपतीचा महिमा सर्वच काळी सारखाच लाभप्रद आहे, पण शिवजयंतीच्या

दिवशी त्याचे माहात्म्य विशेष आहे. दिवा तोच पण मागे परावर्तक असला तर त्याची प्रभा अधिक उजळते. मुहूर्ताचे माहात्म्य हे असे आहे. बाजीरावाच्या या चरित्राला योग्य मुहूर्त आणून दिल्याबद्दल बाजीराव जन्म त्रिशताब्दी समितीचे अध्यक्ष, वक्ते, व कार्यकर्ते यांचा मी अत्यंत आभारी आहे. या सर्व योगायोगांचा विचार केला तर आपले चरित्र, विलंब झाला तरी हरकत नाही, पण आपल्या जन्माच्या त्रिशताब्दीच्या सुप्रसंगीच प्रकाशित व्हावे अशी बाजीरावाचीच इच्छा असावी, असे वाटते. तो आता कालातीत झालेला आहे व कालाच्या पलीकडे गेलेल्या आत्म्याच्या प्रेरणांना स्थळकाळाचे बंधन असू शकत नाही.

१९८८ ते २००० असा एक पुऱ्या तपाचा बाजीरावाचा सहवास मला लाभला, हे माझे भाग्य होय. शिवछत्रपति व बाजीराव, श्रीराम व श्रीकृष्ण, टिळक आणि सावरकर, शेक्सपिअर आणि मिल्टन, व्यास आणि वाल्मीकी अशा पुण्य पुरुषांचा सहवास बहुता सुकृतांची जोडी पदरी असेल तरच मिळतो. आज बाजीरावाचे चरित्र हातावेगळे होत आहे याचा आनंद होत असला तरी इतक्या वर्षांच्या त्याच्या सहवासाला अंतरावे लागणार याचा खेदही वाटतो. पण हे सुख आणि दुःख अपरिहार्य आहे. इतिहासकारांचा मुकुटमणि असलेल्या गिबनने आपल्या महाग्रंथाचा शेवटचा शब्द लिहिला तेव्हा वीस वर्षांचा काळ ज्याच्या सहवासात आनंदात गेला त्या परम मित्राच्या वियोगाने त्याला रडू कोसळले. राजाजींनी भारताचे गव्हर्नर-जनरल-पद सोडले, तेव्हा पुढे काय अशी पोकळी त्यांच्या मनात निर्माण झाली नाही; पण रामचंद्राचे चरित्र सांगून संपले, तेव्हा देव नसलेल्या देवळासारखे त्यांचे मन शून्य झाले. एवढे मोठे स्थितप्रज्ञ लोकमान्य टिळक, पण त्यांनाही गीता रहस्य संपवताना, एवढी वर्षे ज्या विषयाच्या चिंतनात, आनंदात गेली तो आता ग्रंथरूपाने हातावेगळा होत आहे, म्हणून वाईट वाटले. प्रवास करणारा प्रवासी, चित्र काढणारा चित्रकार, शिल्प कोरणारा शिल्पकार, ग्रंथ लिहिणारा ग्रंथकार या सर्वांची नियती हीच आहे. आर. एल्. स्टीव्हन्सनच्या शब्दात - 'Little do ye know your own blessedness, for to travel hopefully is a better thing than to arrive and the true success is to labour.' (तुम्हाला तुमच्या भाग्याची जाणीव नाही. आशेने प्रवास करणे हे मुक्कामावर पोचण्यापेक्षा चांगले आहे आणि खरे यश म्हणजे परिश्रम करणे आहे.)

या ग्रंथात दिलेली छायाचित्रे प्रा. प्र. के. घाणेकर व प्रा. प्रफुल्लकुमार तावडे यांनी दिलेली आहेत. दोघांच्या छायाचित्रांचे वैशिष्ट्य ती पाहिल्याबरोबर लक्षात येईल. ते हे की, लहान

असोत की मोठी असोत, ती छायाचित्रे अत्यंत स्वच्छ, ठळक आणि ठसठशीत आहेत. एखाद्या प्राचीन मूर्तीच्या अंगावरचे बारीकसारीक अलंकार किंवा वस्त्रांच्या चुण्यासुद्धा उठून दिसाव्यात, त्याप्रमाणे या छायाचित्रातले अगदी सूक्ष्म तपशीलसुद्धा स्पष्ट दिसतात. वस्तुत: इतिहास हा काही घाणेकर किंवा तावडे यांचा विषय नाही. घाणेकर वनस्पतीशास्त्राचे प्राध्यापक आहेत व तावडे मेकॅनिकल इंजिनीयर आहेत. पण त्यांचे मराठ्यांच्या इतिहासाबद्दलचे हे निष्काम प्रेम पाहिले म्हणजे 'Love's reason is without reason' (प्रेमाला कारण नसते हेच त्याचे कारण असते) या शेक्सपियरच्या मार्मिक उक्तीची आठवण होते.

इंदूरचे बाळाराव इंगळे यांच्याप्रमाणे प्रा. तावडे यांचा बाजीरावाच्या समाधीचे दर्शन घेण्याचा परिपाठ वर्षानुवर्षे चालू आहे. इतकेच नव्हे तर नर्मदेच्या पाण्यात नर्मदापुत्र असलेला बाजीराव बुडू नये यासाठी त्यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. प्रा. घाणेकर यांनी तर महाराष्ट्रातले दुर्गम स्थळदुर्ग, गिरीदुर्ग, जलदुर्ग पायी तुडवले आहेत, इतकेच नव्हे तर त्यांच्यावर 'जलदुर्गांच्या सहवासात', 'साद सह्याद्रीची - भटकंती किल्ल्यांची', 'आडवाटेवरचा महाराष्ट्र', 'तो रायगड' अशी उणीपुरी चाळीस पुस्तके लिहिली आहेत. तावडे आणि घाणेकर यांचे हे कार्य, मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने इतके मोलाचे आहे की, आज जर शिवछत्रपति असते तर त्यांनी तावड्यांना 'राजेबहाद्दर' आणि गागाभट्टाप्रमाणे घाणेकरभट्टांना 'दुर्गभूषण' असा किताब देऊन उभयतांचा यथोचित गौरव केला असता. त्याचप्रमाणे चि. उमेश पुराणिक यांनी पूर्वार्धाची मुद्रण प्रत बहुत कष्टाने शोधून दिली, त्यामुळेच पुढील हरवलेला भाग लिहिता आला. याबद्दल, त्यांना जरी आवडले नाही तरी, त्यांचे ऋण मान्य करणे माझे कर्तव्य आहे. पितृऋण असते तसेच हे पुत्रऋण म्हणायचे.

असो. एखाद्या नाटकाप्रमाणे, शृंगार, वीर, करुण, उदात्त इत्यादि नवरसांनी ओतप्रोत भरलेल्या बाजीरावाच्या चरित्राचे हे भरत वाक्य संपले. पुन्हा एकदा सर्वांचे आभार, घरच्यांचे आणि बाहेरच्यांचेही!

३६, न्यू आनंदनगर,
तळेगांव दाभाडे.
२८ एप्रिल २०००.

# अनुक्रमणिका व कालपट


प्रास्ताविक

१. त्र्यंबकराव दाभाडे : डभई १७-६२

१६९८, ऑक्टोबर – खंडेराव दाभाडे यास तळेगावची सरपाटिलकी.
१७१७, जानेवारी ११ – खंडेराव दाभाडे यास सेनापतिपद.
१७२५, एप्रिल – सरबुलंदखान गुजरातचा सुभेदार.
१७२७, डिसेंबर १९ – सरबुलंदखानाने मराठ्यांस गुजरातची चौथाई लिहून दिली.
१७२९, सप्टेंबर २७ – खंडेराव दाभाडे याचा मृत्यु.
१७३०, जानेवारी ८ – त्रिंबकराव दाभाडे सेनापति.
१७३०, फेब्रुवारी – चिमाजी अप्पा व उदाजी पवार गुजरातेत उतरले.
१७३०, मार्च २३ गुजरातचे ४४ महाल सरबुलंदखानाने पेशव्यास दिले.
१७३०, जून – सरबुलंदखानाची बदली - अभयसिंग गुजरातचा सुभेदार.
१७३०, नोव्हेंबर – भावसिंग ठोके यास बाजीरावाने सरंजाम दिला.
१७३०, डिसेंबर – निजाम दाभाड्याचे मदतीस निघाला.
१७३०, डिसेंबर – बाजीराव सुरतेस दाखल.
१७३१, मार्च १७ ते २८ – नर्मदेवर निजाम - बंगशाचे खलबत.
१७३१, मार्च – अहमदाबाद येथे बाजीराव - अभयसिंगाची भेट.
१७३१, मार्च २५ – बाजीराव सेनापतीचे रोखे सावळीवर दाखल.
१७३१, एप्रिल १ – डभईची लढाई : त्र्यंबकराव दाभाडे ठार.
१७३१, मे २९ – बाजीराव सातान्यास दाखल.
१७३४, नोव्हेंबर ४ – शाहूने बाजीरावाचे दाभाड्यांशी सख्य केले.

२. जंजिरा - सीदीसात . ६३-१०४

१६४९ – ब्रह्मेंद्रस्वामीचा जन्म
१७०७ – ब्रह्मेंद्रस्वामीकडून परशुराम देवालयाचा जीर्णोद्धार.
१७०७-३१ – जंजिरा : सीदी रसूलची कारकीर्द.
१७२७ फेब्रुवारी ८ – सीदीसाताकडून परशुराम देवालयाचा विध्वंस.
१७२८ – ब्रह्मेंद्रस्वामीचे धावडशीस आगमन.
१७२९ जुलै ४ – कान्होजी आंग्रे याचा मृत्यु.
१७२९ जुलै २१ – सेखोजी आंग्रे सरखेलीवर दाखल.
१७३३ फेब्रुवारी – सीदी रसूल मृत्यु.
१७३३ एप्रिल – बाजीरावाची सीदीवर चढाई.
१७३३ मे – प्रतिनिधि व सरदार कोकणात उतरले.
१७३३ जून ८ – रायगड हस्तगत.
१७३३ जुलै ८ – गोवळकोटची लढाई.
१७३३ ऑगस्ट २८ – सेखोजी आंग्रे मृत्यु.
१७३३ डिसेंबर ६ – इंग्रज-सीदीचा मराठ्यांविरुद्ध तह.
१७३३ डिसेंबर – बाजीरावाने सीदीची मोहीम आवरली.
१७३४ जानेवारी १० – चिमाजी अप्पाची कोकण मोहीम - रायगड काबीज.
१७३६ एप्रिल १९ – रेवासच्या लढाईत सीदीसात मृत्यु.
१७४५ जानेवारी २३ – गोवळकोट व अंजनवेल तुळाजी आंग्र्याने जिंकले.
१७४५ जुलै २६ – ब्रह्मेंद्रस्वामी मृत्यु.

३. दिल्ली १०५-१३३

१७२९ ऑक्टोबर – सवाई जयसिंगाची माळव्यावर नेमणूक.
१७३० – माळव्यावर बंगशाची नेमणूक.
१७३३ फेब्रुवारी – जयसिंगाचा मंदसोरजवळ कोंडमारा.
१७३५ फेब्रुवारी १३ – रामपुऱ्याजवळ शिंदे - होळकरांकडून मोगलांचा पराभव.
१७३५ फेब्रुवारी १४ ते १७३६ मे अखेर – राधाबाईंची काशी यात्रा.
१७३५ मार्च २४ – कोटा येथे खानडौरान मीरबक्षी याने चौथाईचा तह करून दिला.

१७३५ ऑक्टोबर ४ – बाजीराव उत्तरेच्या स्वारीस निघाला.
१७३६ फेब्रुवारी ३-७ – बाजीरावाचा उदेपुरास मुक्काम.
१७३६ मार्च ४ – किशनगडाजवळ बाजीराव - सवाई जयसिंग भेट.
१७३६ मे अखेर – बाजीराव पुण्यास परत.
१७३६ नोव्हेंबर – बाजीराव दिल्लीचे स्वारीस निघाला.
१७३७ जानेवारी १० – भेलसा काबीज.
१७३७ फेब्रुवारी १८ – अटेर काबीज.
१७३७ मार्च १२ – सादतखानाचा मराठ्यांवर दुआबात हल्ला.
१७३७ मार्च २३ – मथुरेवर मोगल उमरावांचा समूह.
१७३७ मार्च २८ – बाजीरावाचा दिल्लीवर हल्ला.
१७३७ एप्रिल ५ – बाजीराव परत जयपुरावर.
१७३७ जुलै १७ – बाजीराव परत पुण्यास.

४. भोपाळ १३४-१५६

१७३७ एप्रिल ७ – बुऱ्हाणपुराहून निजामाचे उत्तरेत प्रयाण.
१७३७ जुलै २ – निजाम दिल्लीस दाखल निजाम - बादशहा भेट.
१७३७ ऑक्टोबर – निजामाची दिल्लीहून माळव्यावर चाल.
१७३७ नोव्हेंबर ३० – बाजीराव नर्मदेवर दाखल.
१७३७ डिसेंबर १३ – भोपाळ जवळ निजाम - बाजीराव झगडा.
१७३७ डिसेंबर १६ – भोपाळवर निजामाचा कोंडमारा.
१७३८ जानेवारी ७ – सराई - दुराईचा तह.

५. नादिरशहा : कालभैरवाचे तांडवनृत्य १५७-२१०

१७३९ जानेवारी ८ – नादिरशहा लाहोरवर दाखल.
१७३९ फेब्रुवारी १३ – सरहिंदवर नादिरशहाकडून बादशहाचा पराभव.
१७३९ मार्च ७ – नादिरशहा दिल्लीस दाखल - पुढे क्रूर कृत्ये.
१७३९ मार्च ७ – सादतखानाचे विषप्राशन व मृत्यु.
१७३९ एप्रिल २५ – बादशहाचे संरक्षण करण्याबद्दल नादिरशहाचे हिंदी संस्थानिकांस व पेशव्यास फर्मान.
१७३९ मे १ – नादिरशहाचे दिल्लीहून स्वदेशी प्रयाण.

६. वसई २११-२६०

१७२४ जानेवारी १० – बाजीराव - पोर्तुगीज तह.
१७३२ फेब्रुवारी १० – बाजीराव - पोर्तुगीज पुन्हा तह.
१७३७ उन्हाळा – बाजीरावाने पोर्तुगीजांवर मोहीम सुरू केली.
१७३७ मार्च २७ – चिमाजी अप्पाकडून ठाण्याचा कोट व इतर ठिकाणे काबीज.
१७३८ डिसेंबर - मे १७३९ – वसईवर दुसरी मोहीम.
१७३८ डिसेंबर २९ – तारापूरचा संग्राम.
१७३९ जानेवारी ९ – माहीम व इतर स्थळे काबीज.
१७३९ जानेवारी १२ – व्यंकटराव घोरपड्याचा गोव्यावर हल्ला.
१७३९ जानेवारी २४ – तारापूर संग्रामात बाजी भीवराव मृत्यु.
१७३९ एप्रिल २७ – व्यंकटराव व पोर्तुगीज यांमध्ये गोव्याचा तह.
१७३९ मे १ – वसईवर निकराचा हल्ला.
१७३९ मे ५ – मराठे - पोर्तुगीज तह.
१७३९ मे १२ – वसई काबीज.
१७३९ डिसेंबर – बाजीरावाची निजाम - नासिरजंगावर मोहीम.
१७४० फेब्रुवारी २७ – मुंगी पैठण येथे बाजीराव - नासिरजंग तह.
१७४० मार्च ७ – बाजीरावाचे खरगोणकडे प्रयाण.
१७४० मार्च २३ – बाजीरावाचे राधाबाईस पत्र.

७. युद्ध नेतृत्व २६१-२९३

बाजीरावाच्या प्रमुख मोहीमा
पालखेड – १७२७ ऑगस्ट ते १७२८ मार्च.
जैतपूर – १७२९ फेब्रुवारी - एप्रिल २८.
दिल्ली – १७३६ नोव्हेंबर - १७३७ मार्च २८.
भोपाळ – १७३७ नोव्हेंबर - १७३८ जानेवारी.
जंजिरा – १७३३ एप्रिल - डिसेंबर.

८. छत्रपती शाहू : 'राजा कालस्य कारणम्' २९४-३४८

१६८२ मे १८ – शाहूचा जन्म.
१६८९ नोव्हेंबर ३ – रायगड येसूबाईने सल्ला करून मोगलांस दिला. शाहू व येसूबाई औरंगजेबाच्या कैदेत.

१६८९ ते १७०७ – शाहूची कैद.
१७०७ फेब्रुवारी – औरंगजेब मृत्यु.
१७०७ मे ८ – शाहूची सुटका - दक्षिणेकडे प्रयाण.
१७०७ जून ८ – शाहूस परसोजी भोसले मिळाला.
१७०७ ऑक्टोबर १२ – खेडची लढाई शाहूचा विजय.
१७०८ जानेवारी १ – शाहूने सातारा घेतला.
१७०८ जानेवारी १२ – शाहूस राज्याभिषेक.
१७१३ नोव्हेंबर १७ – बाळाजी विश्वनाथास पेशवाई.
१७१४ जुलै – ताराबाई व शिवाजी यांस कैद. कोल्हापूरच्या गादीवर संभाजी व राजसबाई.
१७१४ फेब्रवारी २८ – बाळाजी विश्वनाथ व कान्होजी आंग्रे यांची भेट - तह.
१७१९ मार्च २० – बाळाजी विश्वनाथ चौथाईच्या व सरदेशमुखीच्या सनदा घेऊन दिल्लीहून परतला.
१७३१ – येसूबाईचा मृत्यु.
१७२० एप्रिल २ – बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु.
१७२० एप्रिल २७ – बाजीरावास पेशवाईची वस्त्रे.

९. पेशवाईतील रामदास : ब्रह्मेंद्रस्वामी ३४१-३८६

१६४९ – ब्रह्मेंद्रस्वामीचा जन्म.
१६९८ ते १७२७ – स्वामीचे परशुराम क्षेत्री वास्तव्य.
१७२७ फेब्रुवारी ८ – परशुराम देवालयाचा सीदीसाताकडून विध्वंस.
१७२८ – ब्रह्मेंद्रस्वामीचे धावडशीस आगमन (साताऱ्याजवळ)
१७२८ ते १७४५ – स्वामीचे धावडशीस वास्तव्य.
१७४५ जुलै २६ – ब्रह्मेंद्रस्तामीचा मृत्यु.

१०. कुटुंब कलह ३८७-४२८

१७२१ डिसेंबर ६ – नानासाहेबाचा जन्म.
१७३४ – समशेर बहादराचा जन्म.
१७३९ नोव्हेंबर – मस्तानीवर चौकी पहारा.
१७३९ नोव्हेंबर २४ – मस्तानी पहाऱ्यातून पळून बाजीरावाकडे गेली.
१७४० जानेवारी – मस्तानीस कैद

११. रावेरखेडा ४२९-४४२

१७४० मार्च २३ – बाजीराव खानदेशमार्गे बुऱ्हाणपुराकडे.

१७४० मार्च २६ – पुण्यात बाजीरावाचा मुलगा जर्नादन याची मुंज.

१७४० मार्च २९ – चिमाजीचे पुण्यास प्रस्थान. मस्तानीस मुक्त करण्याचा मानस व्यक्त.

१७४० एप्रिल ५ – बाजीराव खरगोण भागात.

१७४० एप्रिल २० – बाजीरावाची छावणी नर्मदाकाठी रावेरखेडा येथे. प्रकृति एकाएकी बिघडते.

१७४० एप्रिल २८ – वैशाख शुद्ध १३ शके १६६२ सोमवार - बाजीरावाचा मृत्यु - मृत्युसमयी काशीबाई व धाकटा पुत्र जनार्दन जवळ.

१२. पुन्हा एकदा मस्तानी ४४३-४६९

१७३४ – समशेर बहाद्दरचा जन्म.

१७४० मे – मस्तानीचा मृत्यु.

१७४९ एप्रिल – समशेर बहाद्दराचे पहिले लग्न - लालकुंवर हिच्याशी.

१७५३ ऑक्टोबर १८ – समशेर बहाद्दराचे मेहेरबाईशी लग्न.

१७५८ – समशेर बहाद्दराचा मुलगा अलीबहाद्दर याचा जन्म.

१७६१ जानेवारी – समशेर बहाद्दराचा पानिपतच्या लढाईत मृत्यु.

१७८८ – अलीबहाद्दराने बांदा येथे जहागीर निर्माण केली.

१८०२ ऑगस्ट २३ – कालिंजर किल्ला घेत असताना अलिबहाद्दर मृत्यु.

१८०३ ऑक्टोबर ५ – दुसऱ्या बाजीरावाने अलीबहाद्दराच्या ताब्यातील बुंदेल खंडांतील छत्तीस लाख सोळा हजार रुपयांचा वसुलाचा प्रदेश सैन्यखर्चासाठी इंग्रजांच्या हवाली केला.

१८१२ – दुसऱ्या बाजीरावाने मस्तानी महाल जमीनदोस्त केला.

१८५७ जून १५ – बांदा नवाब दुसरा अलिबहाद्दर नानासाहेब पेशव्यास सामील. बंडाचे नेतृत्व.

१८५८ नोव्हेंबर १४ – दुसऱ्या अलिबहाद्दराची इंग्रजांपुढे शरणागति.

१८७३ ऑगस्ट १४ – दुसरा अलिबहाद्दर वाराणशीत मृत्यु.